# सहसंचालक तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर अमरावती

Email:- roamravati.dte@gmail.com, ati jdroamt@sancharnet.in internet-http://www.jdroamt.org

Phone:- 0721-2573027, 2572577 Fax No.-0721-2577913


## दिनांक ३/०६/२०१० रोजीचे भांडार पडताळणी आक्षेपा संबंधित सभेचे इतिवृत्त

विभागीय कार्यालयातर्गत येणा-या शासकीय संस्थांचे भांडार पडताळणी पथकाने निरीक्षण करुन घेतलेल्या आक्षेपाचे अनुपालन जलद गतीने करण्याबाबत सर्व शासकीय संस्थामधील प्रबंधक व भांडारपाल यांची दिनांक ३/०६/२०१० रोजी सहसंचालक तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय , अमरावती यांचे अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीचे इतिवृत्त खालील प्रमाणे आहे.

### सदर बैठकीत खालील अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.

१. डॉ. पी. एम. खोडके, प्र. सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती

२. श्री. अ. जा. कन्हाके , सहा. संचालक (अतांत्रिक ) विभागीय कार्यालय, अमरावती

३. श्री. अ. रा. ठाकरे, कार्यालय अधिक्षक, विभागीय कार्यालय, अमरावती

४. श्री. पी. बी. ढवक, प्रबंधक, शासकीय तंत्रनिकेतन, अमरावती..

५. श्री. आर. आर. कुलकर्णी, भांडार पाल , शासकीय तंत्रनिकेतन, अमरावती.

६. श्री. सु. ना. गोस्वामी, कार्यालय अधिक्षक , शासकीय औषधी महाविद्यालय, अमरावती

७. श्री. मंडलिक, भांडारपाल, शासकीय औषधी महाविद्यालय, अमरावती.

८. श्री. सौ. नि. वि. रामटेके, प्रबंधक, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती

९. श्री. रा. शे. बोके, कार्यालय अधिक्षक , शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती.

१०. श्री. सु. का. रोकडे, प्रबंधक, शासकीय तंत्रनिकेतन, वाशिम

११. श्री. पी. एम. सांगळे, भांडारपाल, शासकीय तंत्रनिकेतन, वाशिम

१२. श्री. पी. एम. जाधव, कर्मशाळा अधिक्षक, शासकीय तंत्रनिकेतन, खामगाव

१३. श्री. वि. ना. कुळे . कार्यालय अधिक्षक , शासकीय तंत्रनिकेतन, खामगाव

१४. श्री. ए. पी. गायकवाड, भांडारपाल, शासकीय तंत्रनिकेतन, खामगाव

१५. श्री. बी. डब्लु. चव्हान, प्रबंधक, शासकीय तंत्रनिकेतन, यवतमाळ

१६. श्री. पी. व्ही. नारखेडे, भांडारपाल शासकीय तंत्रनिकेतन, यवतमाळ

१७. श्री. एस. ए. तुमराम, भांडारपाल, शासकीय तंत्रनिकेतन, यवतमाळ

प्राचार्य, शासकीय निवासी महीला तंत्रनिकेतन , यवतमाळ यांनी सदर बैठकीची गार्भियाने दखल घेतली नसून प्रबंधक / कार्यालय अधिक्षक यांना बैठकीस न पाठविता नव नियुक्त भांडारपालांना पाठविले असता त्यांना व्यवस्थित माहीती देता आली नाही, याबाबत खेद वाटतो.


Created with nitroPDF professional

download the free trial online at nitropdf.com/professional

विभागातील संस्थाची प्रलंबित भांडार पडताळणी आक्षेपांची सद्यस्थिती खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र | संस्थेचे नाव | एकुण परिच्छेदांची संख्या | ऑक्टोबर २००८ पासुन निकाली निघालेल्या परिच्छेदांची संख्या | सद्यस्थितीत प्रलंबित परिच्छेदांची संख्या | प्रलंबित परिच्छेदांचा स्तर | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | शासन | संचालक | लेखाधिकारी | संस्था |
| १ | शा. अभियांत्रिकी महा., अमरावती | ८८ | ३८ | ५० | ०० | ११ | १५ | २४ |
| २ | शा. औ.नि.शा., महा., अमरावती | २७ | ०७ | २० | ०० | १२ | ०० | ०८ |
| ४ | शा. तंत्रनिकेतन अमरावती | ११९ | ३४ | ८५ | ०० | ०० | ५८ | २७ |
| ५ | शा. तंत्रनिकेतन, खामगाव | ३४ | १० | २४ | ०० | ०० | ०० | २४ |
| ६ | शा. तंत्रनिकेतन, वाशिम | २९ | ०६ | २३ | ०० | ०० | १३ | १० |
| ७ | शा. तंत्रनिकेतन, यवतमाळ | ३० | १५ | १५ | ०५ | ०२ | ०४ | ०४ |
| ८ | शा. निवासी महीला तंत्रनिकेतन, यवतमाळ | २२ | ०८ | १४ | ०० | ०१ | ०० | १३ |
| एकुण | | ३४९ | ११८ | २३१ | ०५ | २६ | ९० | ११० |

## शासन स्तरावर :-

शासकीय तंत्रनिकेतन, यवतमाळ या संस्थेचे भांडार प्रकरणीचे एकुण ५ आक्षेप शासन स्तरावर प्रलंबित आहे. त्याबाबत श्री. चव्हाण, प्रबंधक यांनी आक्षेपाबाबत प्राचार्यांचे पत्र घेवुन तसेच संचालनालयाची परवानगी घेवुन आक्षेप निकाली काढण्या बाबत शासनाकडे ८ दिवसाच्या आत पाठपुरावा करावा.

## संचालनालय स्तरावरील आक्षेप :-

विभागातील एकुण २६ भांडार पडताळणी आक्षेप मा. संचालकांच्या क्षमापन आदेशार्थ प्रलंबित आहेत, त्याबाबत बैठकीमध्ये खालील प्रमाणे सुचना देण्यात आल्या.

### शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती :-

या संस्थेच्या संचालनालय स्तरावर एकुण ११ आक्षेप प्रलंबित आहेत, सौ. रामटेके प्रबंधक यांनी प्राचार्यांचे पत्र परिच्छेदांचे अभिलेख घेऊन जातीने संचालनालयातील संबंधित विभागाकडून क्षमापन आदेश दिनांक २०/०६/२०१० पर्यंत प्राप्त करुन घ्यावेत .

### शासकीय औषधी महाविद्यालय, अमरावती : -

या संस्थेचे संचालनालय स्तरावर एकुण १२ आक्षेप प्रलबित आहेत. संस्थेने पत्रव्यवहार केला परंतु प्रत्यक्ष जाऊन पाठपुरावा केला नाही. श्री. मंडलीक भांडारपाल यांनी दिनांक ८/०६/२०१० रोजी प्राचार्यांचे पत्र तसेच आवश्यक अभिलेख घेऊन संचालनालयातील संबंधित विभागाकडे पाठपुरावा करुन क्षमापन आदेश प्राप्त करुन घ्यावेत.

### शासकीय तंत्रनिकेतन, यवतमाळ :-

शासकीय तंत्रनिकेतन, यवतमाळ या संस्थेचे एकुण २ आक्षेप संचालनालय स्तरावर प्रलंबित आहेत. श्री. बा.वा. चव्हाण, प्रबंधक यांनी आवश्यक अभिलेखासह संचालनालयातील संबंधित विभागाकडे जाऊन पाठपुरावा करुन ३०/०६/२०१० पर्यंत क्षमापन आदेश प्राप्त करुन घ्यावेत.

### शासकीय निवासी महीला तंत्रनिकेतन, यवतमाळ :-

या संस्थेचा १ आक्षेप संचालनालय स्तरावर प्रलंबित आहे. श्री. परकरवार यांनी आवश्यक अभिलेखासह संचालनालयातील संबंधित विभागाकडे जावुन क्षमापन आदेश दिनांक ३० जून २०१० पूर्वी प्राप्त करुन घ्यावेत.

Created with nitroPDF professional
download the free trial online at nitropdf.com/professional

## लेखाधिकारी स्तर :-

असे निर्देशनास आले की, संस्थाचे भांडार पडताळणी आक्षेप या कार्यालयाचे शिफारशीसह लेखाधिकारी भांडार पडताळणी शाखा, उपसंचालक लेखा व कोषागारे कार्यालय, अमरावती यांचेकडे सादर करण्यात आलेत. परंतु संस्थांकडून पाठपुरावा होत नसल्यामुळे बरेच कालावधी पासून प्रलंबित आहेत सभेमध्ये सुचित करण्यात आले की, संस्थांनी लेखाधिकारी कार्यालयाशी समन्वय साधून वेळोवेळी पाठपुरावा करुन परिच्छेद निकाली काढण्याबाबत जलदगतीने प्रयत्न करावेत, लेखाधिकारी कार्यालयाकडे एकुण ९० परिच्छेदांचे अनुपालन आवश्यक अभिलेखासह सादर केले आहे. संस्थांनी जास्तीत जास्त परिच्छेद निकाली निघतील या बाबत प्रयत्न करावे..

## संस्थास्तर :-

भांडार पडताळीचे एकुण ११० लेखा आक्षेप संस्था स्तरावर प्रलंबित आहेत. याबाबत सभेमध्ये भांडार पडताळणीचे आक्षेपानुसार कालमर्यादा ठरवून दिली असून संस्थेने कालमर्यादेच्या आत अनुपालन अहवाल आवश्यक अभिलेख्यासह या कार्यालयास सादर करावा. आक्षेपाचे अनुपालन पूर्ण करण्याचे संस्थानिहाय वेळापत्रक खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | संस्थेचे नाव | संस्था स्तरावर प्रलंबित आक्षेपाची संख्या | त्यापैकी अनुपालन पूर्ण करावयाच्या आक्षेपाची संख्या | अनुपालन पूर्ण करण्यास दिलेली कालमर्यादा |
|---|---|---|---|---|
| १ | शासकीय अभियांत्रिकी महा, अमरावती | २४ | १७<br>०६<br>०१ | दि. २०/०६/२०१० पूर्वी<br>दि.२०/०७/२०१० पूर्वी<br>दि. २०/०८/२०१० पूर्वी |
| २ | शासकीय औषधी महाविद्यालय, अमरावती | ०८ | ०६<br>०२ | दि. २०/०७/२०१० पूर्वी<br>दि. २०/०७/२०१० पूर्वी |
| ३ | शासकीय तंत्रनिकेतन, अमरावती | २७ | १९<br>०८ | दि. २०/०६/२०१० पूर्वी<br>दि. २०/०७/२०१० पूर्वी |
| ४ | शासकीय तंत्रनिकेतन, खामगाव | २४ | १९<br>०५ | दि. २०/०६/२०१० पूर्वी<br>दि. २०/०७/२०१० पूर्वी |
| ५ | शासकीय तंत्रनिकेतन, वाशिम | १० | ०८<br>०२ | दि. २०/०६/२०१० पूर्वी<br>दि. २०/०७/२०१० पूर्वी |
| ६ | शासकीय तंत्रनिकेतन, यवतमाळ | ०४ | ०२<br>०२ | दि. २०/०६/२०१० पूर्वी<br>दि. २०/०७/२०१० पूर्वी |
| ७ | शासकीय निवासी महीला तंत्रनिकेतन, यवतमाळ | १३ | ०७<br>०६ | दि. २०/०६/२०१० पूर्वी<br>दि. २०/०७/२०१० पूर्वी |

संस्था प्रमुखांनी ठरवून दिलेल्या कालमर्यादेत भांडार पडताळणी आक्षेप निकाली काढण्याबाबत विशेष प्रयत्न करावेत याबाबत संस्थास्तरावर आढावा बैठक घेण्यात यावी संस्थास्तरावरील भांडार पडताळणीचे आक्षेप संस्थेतील ज्या विभागाशी संबंधित असतील त्या विभागातील अधिकारी / कर्मचारी उन्हाळी सुटी, अथवा रजेवर असतील तर त्याना टेलीग्राम करुन तात्काळ कर्तव्यार्थ रुजू करुन घ्यावे. व आक्षेपांचे अनुपालन करुन घ्यावे जे अधिकारी / कर्मचारी आदेशाची अवहेलना करतील त्यांचा अहवाल या कार्यालयाकडे सादर करावा, वरील प्रकरणी अपेक्षित कार्यवाही न झाल्यास आपल्या विभागाच्या निष्क्रियतेबाबत शासनास अहवाल सादर करण्यात का येवु नये ? याबाबत वरिष्ठाकडून विचारणा झाल्यामुळे संस्थाप्रमुखांनी / प्रबंधकांनी विशेष लक्ष द्यावे.

सहसंचालक तंत्रशिक्षण
अमरावती.

Created with nitroPDF professional
download the free trial online at nitropdf.com/professional